## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

**विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार सल्लागार समितीची दिनांक २६.०२.२०१३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत .**

दिनांक २६.०२.२०१३ रोजी दुपारी ०१.०० वाजता मा. मंत्री (कामगार) आणि विशेष सहाय्य तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार राज्य सल्लागार समिती यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा.श्री.हसन मुश्रीफ,<br>मंत्री (कामगार) | : | अध्यक्ष |
| २. | मा.श्री. भास्कर मुंडे,<br>सचिव (कामगार), | : | |
| ३. | मा.श्री. मधुकर गायकवाड,<br>कामगार आयुक्त तथा मुख्य निरीक्षक | : | पदसिध्द सदस्य |
| ४. | मा.श्री. सु. के. गावडे,<br>उप सचिव (कामगार) | : | |
| ५ | मा.श्री. अनिल शिवाजीराव भोसले,<br>विधानपरिषद सदस्य | : | सदस्य |
| ६. | मा.आ.श्री. नरेंद्र पाटील,<br>विधानसभा सदस्य | : | सदस्य |
| ७ | श्री. वि. अ. मोरे,<br>संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, मुंबई. | : | सदस्य |
| ८. | श्री. बंडू गोपाळ मांगले | : | सदस्य |
| ९. | श्री. मुस्ताक अब्दुला दळवी | : | सदस्य |
| १०. | डॉ. गजानन देसाई, | : | सदस्य |
| ११. | श्री. आसिफ उमर कासकर,<br>वास्तुशास्त्र अधिसंघाचा प्रतिनिधी | : | सदस्य |
| १२. | श्री.आर.व्ही.कुलकर्णी,<br>कामगार उप आयुक्त,मुबई,<br>कामगार आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई. | : | सचिव |

मा.कामगार आयुक्त यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर मागील इतिवृत्ताचे वाचन करुन मान्यता घेण्यात आली.

सल्लागार समितीचे सचिव,मा.कामगार आयुक्त,मुंबई यांनी सर्व सदस्यांना अशी माहिती दिली की, बांधकाम मंडळाच्या दि.२३.१.२०१३ रोजीच्या झालेल्या बैठकीत मंडळाच्या कल्याणकारी योजनांबाबत नियम तयार करण्यात आलेले असून, ते शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आलेले आहेत. सदर नियम शासनाच्या तज्ञ समितीकडे अंतिम करण्यासाठी व त्याच्या शिफारसीसाठी पाठविण्यात येणार आहेत.

घरबांधणीसाठी अनुदान देता येणार नसून कर्ज किंवा उचल देता येते ही बाब मा.कामगार आयुक्त यांनी सदस्यांच्या निदर्शनास आणली व त्याबाबतही नियम करावे लागतील असे ही सांगितले. मा.अध्यक्षांनी याबाबत पुर्ण विचार करुन नियम करावेत व त्यानंतर त्याची अंमलबजावणी करणे सुलभ होईल असे सांगितले.

श्री.गजानन देसाई यांनी असे सांगितले की, मंडळ स्थापन होवून एक वर्ष झाले तरी कामगारांची नोंदणी १ लाखापेक्षा जास्त झालेली नाही. मालक ९० दिवसांचा दाखला कामगारास देण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे कामगारांची नोंदणी वाढविण्यास अडचणीचे ठरत आहे. त्यासाठी मान्यताप्राप्त संघटनेने असा दाखला देण्याबाबत निर्णय घेण्यात यावा. तसेच कायद्यामध्ये ९० दिवसांची अट आहे ती शिथिल करण्यात यावी, अशी मागणी केली. त्यावर श्री.दळवी यांनी संघटनेकडून ९० दिवसांचा दाखला देण्यास विरोध दर्शविला. यावर मा.अध्यक्षांनी केंद्र शासनाच्या याबाबत विचारविनिमय सुरु असून केंद्र शासन काय निर्णय घेते ते आपण पहावे असे सुचविले.

मा.अध्यक्षांनी कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी जनजागृती आवश्यक असल्याचे प्रतिपादन करुन त्या दृष्टिने मंडळाची माहिती व विविध योजना याची जाहीरात प्रसिध्दी माध्यमाव्दारे करण्यात येत आहे असे सदस्यांच्या निदर्शनास आणून दिले व त्यामुळे कामगारांची संख्या वाढत असल्याचे सर्वाच्या निदर्शनास आणून दिले.

श्री.दळवी यांनी जनजागृतीसाठी एक समिती नेमण्यात यावी व समितीने राज्यात विविध ठिकाणी जनजागृती शिबिरे घेवून मालक, कंत्राटदार, कामगार, कामगार संघटना यांच्यात जनजागृती करावी अशी सूचना मांडली. त्यास श्री.मांगले व श्री.देसाई यांनीही सहमती दर्शविली. मा.अध्यक्षांनी याबाबत एक समिती गठीत करण्यात यावी व महाराष्ट्रात जनजागृती शिबिरे आयोजित करण्यात यावी अशी सूचना केली.

श्री.देसाई यांनी नाका कामगारांनाही नोंदीत करुन घेण्याबाबत त्यांचे मत मांडले. त्यास मा.आ.श्री.नरेंद्र पाटील यांनी विरोध दर्शविला. यावर अध्यक्षांनी असे सांगितले की ही बाब केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.देसाई यांनी नाका कामगारांसाठी एक केंद्र स्थापन करुन व तेथे त्यांना निवा-याची सोय करण्यात यावी. त्यावर मा.श्री.नरेंद्र पाटील यांनी यासाठी जागा उपलब्ध होणार नाही हि बाब व्यवहार्थ नाही असे सांगितले.

श्री.मांगले यांनी मंडळाच्या बैठकीत जे निर्णय होतात ते सल्लागार समितीच्या सदस्यांना कळविले जात नाहीत, असे निर्णय सल्लागार समितीच्या सदस्यांना अवगत करावेत असे सुचविले. श्री.दळवी यांनी त्यास सहमती दर्शविली.याबाबत मा.अध्यक्षांनी मंडळाच्या बैठकीत जे काही निर्णय होतात त्याची माहिती वेळोवेळी सल्लागार समितीच्या सदस्यांना देण्याबाबत सूचना केल्या.

श्री.मांगले,श्री.देसाई व श्री.दळवी व इतर सदस्यांनी कामगारांची नोंदणी बायोमॅट्रीक पध्दतीने करण्यात यावी असे सांगितले. मा.अध्यक्षांनी असे सांगितले की हे काम ज्यांना दिले होते त्या ग्लोडाईन कंपनीने हे काम व्यवस्थितपणे केलेले नाही. त्यावर मा.सचिव (कामगार) यांनी ते काम ग्लोडाईन करु शकेल असे वाटत नाही, असे मत व्यक्त केले. त्यावर इतर सदस्यांनी याबाबत ते काम दुस-या एजन्सीला आऊट सोर्सींग पध्दतीने देण्याबाबत सूचना केल्या. मा. कामगार आयुक्त यांनीही आता हे काम आऊट सोर्सींग एजन्सीला सुपूर्द करता येवू शकेल असे मत प्रदर्शित केले. मा.अध्यक्षांनी याबाबत प्रथम ग्लोडाईन बाबत अंतिम निर्णय घेणे आवश्यक आहे असे सांगून याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्याबाबत सूचना केल्या.

श्री.देसाई यांनी घरबांधणी कामगारांच्या मुलांसाठी वसतीगृह बांधण्यात यावीत अशी सूचना केली. त्यास इतर सदस्यांनी सहमती दर्शविली होती. परंतु यावर मा.कामगार आयुक्त,मुंबई यांनी कामगार विभागाकडे अशी यंत्रणा नसल्याने व वसतीगृह चालविण्याचा अनुभव नसल्यामुळे ही योजना चालविणे शक्य होणार नाही असे सांगितले. यावर श्री.देसाई व श्री.मांगले यांनी वसतीगृह चालविण्यासाठी एनजीओ किंवा इतर संस्थाकडे ते काम देता येईल असे सुचविले. मा.अध्यक्षांनी वसतीगृह बांधणे व ते चालविणे ही बाब व्यवहार्थ नसल्याचे सांगितले.

सदस्यांनी कौशल्यवृध्दीसाठी तामिळनाडूच्या धर्तीवर एक संस्था निर्माण करावी असे सुचविले व त्यात बांधकामासंबंधीच्या वेगवेगळया विषयाचे प्रशिक्षण देण्यासंबंधी सोय ॲकाडमीत करावी असे सुचविले. मा.अध्यक्षांनी याबाबत विचारविनिमय करुन माहिती घेवून तसा नियम करुन ॲकाडमी सुरु करण्याबाबत संमती दर्शविली.

मा.सदस्यांनी भत्ते मिळत नसल्याचे सांगितले. त्यावर मा.सचिव (कामगार) यांनी त्यांना देय असलेले भत्ते सर्व सदस्यांना देण्यात येतील असे प्रतिपादन केले.

मा.अध्यक्षांनी सर्व कामगारांची नोंदणी वाढविण्याबाबत सूचना केल्या. त्याबाबत बांधकाम व्यवसायिकांच्या मनामध्ये जी भिती आहे ती काढली पाहिजे, म्हणजे कामगारांची नोंदणी वाढविण्यास मदत होईल. त्या दृष्टिने जनजागृती करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

श्री.मांगले यांनी तालुकानिहाय कामगारांची नोंदणीबाबतची माहिती उपलब्ध आहे का, अशी विचारणा केली असता, मा.कामगार आयुक्त यांनी अशी माहिती विभागीय कामगार कार्यालयात उपलब्ध असल्याचे सांगितले.

मा.अध्यक्षांनी शासनाने नुकताच संबंधीत विभागाच्या संमतीने शासन निर्णय दि.२५ फेब्रुवारी,२००३ रोजी निर्गमित केला असून, त्यानुसार महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत बांधकाम मजूर म्हणून काम करणा-या कामगारांना मंडळात नोंदीत करुन त्याला मंडळाच्या योजनांचा लाभ देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला असल्याचे सांगितले. त्यामुळे मंडळाकडे नोंदीत कामगारांची संख्या पावणेदोन लाखाने वाढण्याची शक्यता असून त्यामुळे अशा कामगारांना मंडळाच्या विविध योजनांचा लाभ मिळू शकेल व मंडळाच्या कामास गती येईल असे सांगितले. याचे सर्व सदस्यांनी स्वागत करुन शासनाचे अभिनंदन केले.

बैठकीच्या शेवटी मा.अध्यक्षांनी कामगारांच्या नोंदणीबाबत गती देणे आवश्यक असून त्याबाबत प्रयत्न करण्यात येतील अशा सूचना दिल्या व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.